**आयुक्त राज्य गुप्तवार्ता विभाग (SID), महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या आस्थापनेवर शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेकरिता विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.**

09 JAN 2024

जाहीरात क्र. आयुक्त/रागुवि/आस्था-१/सेनि-आयबी-रॉ-रागुवि./नियुक्ती/२०२३/83 मुंबई, दि. /०१/२०२४

---

महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे या संस्थेमध्ये गुप्तवार्ता, सुरक्षा, मुलतत्ववाद व दहशतवाद इत्यादी संदर्भात अधिकारी व अंमलदार यांना प्रशिक्षण दयावयाचे आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७/१२/२०१६ मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाच्या IB/RAW / रा.गु.वि. येथून सेवा निवृत्त झालेले व गुप्तवार्ता, सुरक्षा, मुलतत्ववाद व दहशतवाद इत्यादी मुलभूत विषयावरील आधारीत विविध प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी काम करण्यास सक्षम असलेले अधिकारी यांची महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे करार पध्दतीने नियुक्ती करणे आहे.

सेवा करार पध्दतीने घेण्याबाबत अर्जाचा नमुना, प्रतिज्ञाप्रत्र, अनुभव,वयोमर्यादा, मासिक पारिश्रमिक, भत्ते, कर्तव्य व जबाबदाऱ्या, अटी व शर्ती पोलीस महासंचालक यांच्या www.mahapoli ce.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात IB/RAW/ SID येथून निवृत्त अधिकारी असे नमूद करुन जाहिरातीच्या दिनांकापासून १५ दिवसापर्यत आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई मित्तल टॉवर, बी.विंग, ३ रा मजला, नरीमन पॉईट मुंबई-४०००२१ (लक्षवेध:- कार्यासन अधिकारी, आस्थापना) या पत्यावर पाठवण्याची दक्षता घ्यावी. तद्नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे अर्जदार यांनी जोडावेत. शासकीय कार्यालयातून उत्तम कामगिरी करुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकऱ्यांकडून राज्य गुप्तवार्ता विभागामध्ये एक वर्ष मुदतीच्या करारावर नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**टिप, सूचना व अटी:-**

१. वर दिलेल्या पदसंख्येत/ नियुक्तीच्या ठिकाणात बदल होण्याची शक्यता असू शकते. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहेत.

२. उपरोक्त पदावर पात्र उमेदवारांची नेमणूक मुलाखतीद्वारे करण्यांत येईल.सदर मुलाखतीचा दिनांक स्वतंत्रपणे पात्र उमेदवारांस कळविण्यात येईल.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७/१२/२०१६ मधील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक असेल.

शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे ....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३
गादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ डिसेंबर, २०१६

वाचा : शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३
दि. ८ जानेवारी, २०१६ व दि. २ मार्च, २०१६

प्रस्तावना :-

सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करुन करार पद्धतीने घेण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. ८.१.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. दि.२ मार्च २०१६ च्या शासन निर्णयानुसार पॅनलला (सूचीला) मान्यता देणे आणि नियुक्ती करणेबाबतचे अधिकार विभागप्रमुखांना प्रदान करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांस देण्यात आलेले आहेत.

उक्त शासन निर्णयातील तरतुदींनुसार कंत्राटी तत्वावर नेमण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या मासिक पारिश्रमिकाची परिगणना करताना अडचणी उद्भवत असल्याने त्यामध्ये योग्य ती सुधारणा करणे; त्याचप्रमाणे काही मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे यांना उक्त शासन निर्णयातील तरतूदी शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय -

१. दि.८.१.२०१६ व दि. २.३.२०१६ हे दोन्ही शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून खालीलप्रमाणे सर्वसमावेशक निर्णय घेण्यात येत आहे.

२. प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील विविध विषयांसंदर्भात **"विवक्षित सेवा/कामांसाठी" विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करुन घेता येतील.** उदा. आस्थापनाविषयक बाबी/ सेवाप्रवेश नियम, पायाभूत सुविधा निर्मिती, नागरी सेवा पुरविणे, विशेष गुप्त वार्ता, योजनांचे मूल्यमापन इत्यादी, *आवश्यकतेप्रमाणे इतर विवक्षित सेवा/कामांचा यामध्ये समावेश करता येईल.* त्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यपद्धती विहीत करण्यात येत आहे

अ) निवडप्रक्रिया व नियुक्ती -

१) **नामिकासूची** (Panel) - करार पध्दतीने "विवक्षित कामांसाठी" नेमणूका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहीत पद्धतीने जाहिरात देऊन "विवक्षित कामांसाठी" पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहीरातीमध्ये नामिकासूचीत नियुक्त करावयाच्या एकूण व्यक्तिंची संख्या, विवक्षित कामाचे स्वरुप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रामिक ( शासन निर्णयातील ड (१) (क) च्या अनुषंगाने)

यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवारांची निवड करून नामिकासूची (Panel) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी.

२) **नामिकासूचीची (Panel) वैधता** - सदर नामिकासूचीतील व्यक्तिंमधूनच करार पध्दतीने नियुक्ती करण्यात यावी. सदर नामिकासूचीची वैधता जास्तीत जास्त ३ वर्ष राहील तसेच त्या सूचीचा वार्षिक आढावा घेण्यात यावा.

३) **एमपॅनलमेंटचा कालावधी** - विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी सक्षम प्राधिकारी यांनी निश्चित करावा.

४) **बंधपत्र/हमीपत्र** - नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात यावे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात, करार पद्धतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

५) **नियुक्ती आदेश** - नामिकासूचीतील व्यक्तीकडून बंधपत्र प्राप्त झाल्यानंतर करार पद्धतीने नियुक्ती देण्याबाबतच्या आदेशांमध्ये "एमपॅनलमेंटचा विषय", "विवक्षित स्वरुपाचे काम" आणि ते काम पूर्ण करण्यासाठी अपेक्षित असलेल्या कालावधीचा स्पष्टपणे उल्लेख करुन सक्षम प्राधिकारी यांनी नियुक्ती आदेश काढावेत.

६) **करार पद्धतीने नियुक्ती द्यावयाच्या व्यक्तिंची संख्या** - करार पध्दतीने नियुक्ती देताना कार्यालयातील/आस्थापनेवरील एकूण मंजूर पदसंख्येच्या जास्तीत जास्त १० % इतके अधिकाऱ्यांना करार पद्धतीने नियुक्ती देता येईल. करार पद्धतीने नियुक्त्या करण्याचे प्रस्ताव तयार करताना कामाचे स्वरुप, आकस्मिकता, सार्वजनिक हित इ. बाबी विचारात घेण्यात याव्यात.

७) **करार पद्धतीने नियुक्तीची कालमर्यादा** - सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात यावी. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करता येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

८) **वयोमर्यादा** - करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि, ज्या व्यक्तिंच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरीष्ठ अधिकाऱ्याच्या/प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतील मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

९) **सक्षम प्राधिकारी** -

(१) गट-अ (ग्रेड पे रु. ७६००/- किंवा अधिक) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार शासनास असतील.

(२) गट-अ ( ग्रेड पे रु. ७६००/- पेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ९(२२) नुसार घोषित करण्यात आलेल्या विभाग प्रमुखांना (Head of the Department) असतील.

(३) गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) या संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार प्रादेशिक प्रमुखांना (Regional Heads) असतील.

(४) गट-क व गट-ड संवर्गातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येऊ नये.

**ब) अर्हता व अनुभव -**

१) विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात यावी.

२) करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**क) नियमित मंजूर पदे**

१) सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार (Contractual) पद्धतीने करण्यात येणारी नियुक्ती ही **नियमित** स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता केवळ **विवक्षित** कामासाठीच करण्यात यावी.

२) नियमित मंजूर पदांवर (Sanctioned Posts) करार पद्धतीने नियुक्ती करता येणार नाही, अशी पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहीत केलेल्या मार्गाने नियमितपणे भरण्यात यावीत.

३) करार पद्धतीने नियुक्तीमुळे शासन सेवेत असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पदोन्नतीच्या संधीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

**ड) मासिक पारिश्रमिक व भत्ते -**

१) **मासिक पारिश्रमिक -**

**(क) शासकीय / निमशासकीय सेवा** - सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपद्धतीचे पालन करुन करार पद्धतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.

*(तथापि, वेतनासाठी शासनाकडून अनुदान मिळत नसलेल्या शासकीय उपक्रम, 'महामंडळे, मंडळे, सांविधिक संस्था यांच्याबाबतीत वरीलप्रमाणे निश्चित*

*होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाची रक्कम वाढविण्याचे अधिकार संबंधित शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे यांच्या संचालक मंडळास आणि सांविधिक संस्थेच्या प्रमुखास/अध्यक्षास राहतील.)*

(ख) **निवृत्तीवेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा** - ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना करार पद्धतीने नियुक्त करताना, सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्त्याची रक्कम केवळ हिशेबासाठी परिगणित करुन त्या आधारे त्यांचे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात यावे.

२) **भत्ते** - उक्त तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५ %" इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात यावी.

*(मासिक पारिश्रमिक व भत्यांची परिगणना करण्याबाबतचे मार्गदर्शनपर उदाहरण या शासन निर्णया सोबतच्या "परिशिष्ट-अ" येथे उद्धृत करण्यात आली आहेत.)*

३) **प्रवासभत्ता व दैनिक भत्ता** - करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

४) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे अशा व्यक्तींना अनुज्ञेय होणाऱ्या पारिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतन व महागाई भत्ता यावर होणार नाही.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तिंच्या पारिश्रमिकापोटी व भत्यांपोटी होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या "कार्यालयीन खर्च" या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

**इ) इतर अटी व शर्ती –**

१) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे /सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

४) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळावेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

३. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

४. करार पध्दतीने नियुक्ती करताना सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता असणार नाही.

५. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देण्यात येऊ नये.

६. हा शासन निर्णय सर्व शासकीय कार्यालये, शासकीय उपक्रम, संविधिक संस्था, मंडळे/महामंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना लागू राहील.

७. शासन निर्णय दि. ०८.०१.२०१६ व दि. ०२.०३.२०१६ मधील तरतुदीनुसार करार पध्दतीने करण्यात आलेल्या नियुक्त्यांना देखील **या शासन निर्णयातील तरतूदी सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील.**

८. हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्रमांक : अनौ. सं. क्र. ७७१/ १६/व्यय-४ दिनांक ३.१२.२०१६ नुसार दिलेल्या सहमतीन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६१२१७१७१८२४१३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Mukesh Khullar

Digitally signed by Mukesh Khullar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6481e097dn98eaae3205801305 4ebced12d1340cc624fcd0132235fb0c5443 8, cn=Mukesh Khullar
Date: 2016.12.17 17:51:18 +05'30'

( मुकेश खुल्लर )
प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई, (५ प्रती)
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, (५ प्रती)
३) सर्व.मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधान सभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ
६) मा.अध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
७) मा.सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
८) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
९) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.

१०) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय .विधान भवन.मुंबई.
११) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१२) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१३) *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई /नागपूर/औरंगाबाद खंडपीठ
१४) *प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय. मुंबई
१५) *राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१६) *सचिव, राज्य माहिती आयोग,मुंबई.
१७) *महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता). मुंबई / नागपूर
१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
१९) विभागीय आयुक्त (सर्व)
२०) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
२१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)
२२) सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख
२३) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
२४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२५) निवडनस्ती, कार्यासन-१३. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

*पत्राने

शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेताना मासिक पारिश्रमिकात सुधारणा करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००(भाग-१)/१३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०८ सप्टेंबर, २०२३.

वाचा :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७.१२.२०१६.
२. शासन शुध्दीपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि. २१.०२.२०१८.
३. शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र. १०० (भाग-१)/ १३, दि. १४.०७.२०२१.

**प्रस्तावना :-**

शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबतचा शासन निर्णय दि. १७.१२.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासनातील तरतूदीनुसार करार पध्दतीने नेमणूक करताना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येते.

२. सदर शासन निर्णयानुसार निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण केलेल्या अधिकाऱ्यांच्या मानधनाची परिगणना करताना निवृत्तीवेतनातून अंशराशीकृत मूल्य वजा केले जाते. तथापि. अंशराशीकरण न केलेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत संपूर्ण निवृत्तीवेतनाची रक्कम मानधन निश्चित करताना विचारात घेतली जाते. त्यामुळे समान अंतिम वेतन घेणारे अधिकारी करार तत्वावर नियुक्त झाल्यास, त्यांचे मासिक पारिश्रमिक वेगवेगळया प्रकारे निश्चित करण्यात येते. तसेच काही कारणांमुळे अंतिम निवृत्तीवेतन निश्चित होण्यास विलंब झाल्यास तात्पुरत्या निवृत्तीवेतनावर मासिक पारिश्रमिक निश्चित करण्याची वेळ येते. त्यामुळे अंशराशीकृत मूल्य वजा करावे किंवा कसे याबाबत विभागांकडून विचारणा करण्यात येते. यास्तव, उक्त शासन निर्णयातील तरतूदीमध्ये मासिक पारिश्रमिकाची व भत्यांची परिगणना करताना अंशराशीकृत निवृत्तीवेतन न वगळता मासिक पारिश्रमिक निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबतच्या शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. १७.१२.२०१६ मधील परिच्छेद २ येथील (ड) (१) (क) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

**ड) मासिक पारिश्रमिक व भत्ते -**

१) **मासिक पारिश्रमिक -**

**(क) शासकीय/निमशासकीय सेवा -** सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत

असलेले मुळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.

(मासिक पारिश्रमिक व भत्त्यांची परिगणना करण्याबाबतचे मार्गदर्शनपर उदाहरण परिशिष्ट-अ येथे उद्धृत करण्यात आले आहे.)

२. वरीलप्रमाणे सुधारणा सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

३. शासन निर्णय, दि. १७.१२.२०१६, शासन शुध्दीपत्रक दि. २१.०२.२०१८ व शासन परिपत्रक दि. १४.०७.२०२१ मधील इतर तरतूदीत कोणताही बदल नसून त्या तरतूदी यापुढे यथास्थिती लागू राहतील.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्रमांक १७१/सेवा ६, दि. १२.०७.२०२३ नुसार दिलेल्या सहमतीन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३०९०८१५०३३३४२०७ असा आहे. हा निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT SAJANIKAR

(प्र.ज.साजणीकर)
सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य.
१२. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१४. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१५. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा,मुंबई.
१८. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई.
१९. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,

२०. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२२. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
२३. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई
२४. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई
२५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
२६. सर्व विभागीय आयुक्त,
२७. सर्व जिल्हाधिकारी,
२८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३०. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख/प्रादेशिक प्रमुख/कार्यालय प्रमुख.
३१. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
३२. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३३. निवडनस्ती (कार्यासन १३).

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण २७१५/प्र.क्र. १०० (भाग-१)/१३,
दि. ०८ सप्टेंबर, २०२३ सोबतचे

## परिशिष्ट-अ

## मासिक पारिश्रमिकाची व भत्त्यांची परिगणना करण्याबाबतचे उदाहरण

| मुद्दा | उदा. क्र. १ |
|---|---|
| निवृत्तीचा दिनांक | दि. ३१.०५.२०२० |
| सेवानिवृत्तीच्या दिनांकास निश्चित झालेले मूळ निवृत्तीवेतन | रु. ४८,२००/- |
| करार पध्दतीने नियुक्तीचा दिनांक | दि. १५.१०.२०२२ |
| करार पध्दतीने नियुक्ती वेळी देय असलेल्या निवृत्तीवेतनाची रक्कम | रु. ४८,२००/- |
| करार पध्दतीने नियुक्तीच्यावेळी प्राप्त होणाऱ्या मुळ निवृत्तीवेतनाची रक्कम + महागाई भत्ता | रु. ४८,२००/- + रु. १६,३८८ (माहे ऑक्टोबर, २०२२ @ ३४%)<br>एकूण रु. ६४,५८८ |
| मासिक पारिश्रमिकाची रक्कम (शासकीय सेवा व निमशासकीय सेवा) | रु. ६४,६००<br>{ शंभरात रुपांतरीत } |
| "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह कमाल अनुज्ञेय रक्कम (मासिक पारिश्रमिकाच्या २५%) | रु. १६,१५०*<br>*जास्तीत जास्त |
| एकूण | रु. ८०,७५०*<br>*जास्तीत जास्त |

*****

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७ डिसेंबर, २०१६ सोबतचे

## परिशिष्ट-अ

## मासिक पारिश्रमिकाची व भत्यांची परिगणना करण्याबाबतचे उदाहरण

| मुद्दा | उदा. क्र. १ |
|---|---|
| निवृत्तीचा दिनांक | दि.३०.११.२०१३ |
| निश्चित झालेले मूळ निवृत्तीवेतन | रु.२५,३०० |
| अंशराशीकृत मुल्य | रु. १०,१२० |
| करार पद्धतीने नियुक्तीचा दिनांक | दि.१५.९.२०१६ |
| नियुक्तीच्या वेळी देय असलेल्या निवृत्तीवेतनाची रक्कम | रु.१५,१८० |
| नियुक्तीच्या वेळी प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतनाची रक्कम + महागाई भत्ता | रु.१५,१८० + रु. ३१,६२५ (माहे नोव्हेंबर, २०१६ @ १२५%)<br>एकूण रु. ४६,८०५ |
| मासिक पारिश्रमिकाची रक्कम (शासकीय सेवा व निमशासकीय सेवा) | रु. ४६,८०० #<br>{शंभरात रुपांतरीत} |
| निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह कमाल अनुज्ञेय रक्कम (मासिक पारिश्रमिकाच्या २५ %) | रु. ११,७०० *<br>* *जास्तीत जास्त* |
| एकूण | रु. ५८,५०० *<br>* *जास्तीत जास्त* |

# तथापि, वेतनासाठी शासनाकडून अनुदान मिळत नसलेल्या शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे/संविधिक संस्था यांच्याबाबतीत सदर पारिश्रमिकाची रक्कम वाढविण्याचे अधिकार संबंधित शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे यांच्या संचालक मंडळास आणि संविधिक संस्थेच्या प्रमुखास/अध्यक्षास राहतील.

****

# अर्जाचा नमूना

[illegible] अ' * पदाकरिता अर्ज

| एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुस-या फोटो चे मागील बाजूस नाव लिहून लिफाफ्यात जोडावा. |
|---|

[illegible] उपयोगासाठी

अर्ज क्रमांक : ☐☐☐☐☐☐☐

अर्ज स्विकारल्याचा दिनांक : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी (दिनांकासह) : ____________

सूचना : अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

# अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

* आवश्यक नसेल तेथे खोडावे.

## अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती :

1. **अर्जदाराचे संपूर्ण नांव :** **आडनांव** **नांव** वडीलांचे / पतीचे नांव
   मराठीत
   : ____________________________________________

   # इंग्रजीत :
   ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

2. **पत्रव्यवहाराचा पत्ता :** ____________ ____________________
   ____________________________________________
   तालुका :____________ जिल्हा :____________ पीन कोड : ☐☐☐☐☐☐

3. **कायमचा पत्ता :**
   ____________________________________________
   तालुका :____________ जिल्हा :____________ पीन कोड : ☐☐☐☐☐☐

4. **दूरध्वनी क्रमांक -** लॅन्डलाईन ____________मोबाईल क्रमांक :____________

4A. **ई-मेल :** ____________________

5. **जन्मदिनांक :** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ जन्म स्थळ :____________

6. दिनांक ०१/०६/२०१९ रोजीचे वय : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐
   दिवस महिना वर्ष

7. लिंग : पुरूष ☐ / महिला ☐

8. धर्म : ____________ जात : ____________

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती :

10. शैक्षणिक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव (विद्यालय/ महाविद्यालय) | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दि. | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ. १०वी) अथवा जूनी ११ वी परिक्षा. | | | | | |
| २. उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ. १२ वी.) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |
| ५. इतर शैक्षणिक गुणवत्ता | | | | | |

11. इतर शैक्षणिक अर्हता :

संगणक प्रशिक्षीत आहे काय ? : होय ☐ / नाही ☐

12-अ अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात/ बध्द करण्यात/ दंड करण्यात/ सिध्दोषी ठरवण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना/ निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/ काढून टाकण्यात आले आहे काय ? होय ☐ नाही ☐

12-ब हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? होय ☐ नाही ☐

(13-अ किंवा 13-ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दती, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यीदीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.

** ** **

**अर्जासोबत जोडावयाची सांक्षाकीत कागदपत्रे :-**

१. शासन मान्य ओळखपत्र
२. जन्मतारीख बाबत पुरावा
३. शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र.
४. सेवानिवृत्ती आदेश

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.

मी श्री./ सौ. / ______________________ याद्वारे प्रतिज्ञ पूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणिवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

**सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.**